# भरारी

## अस्थिव्यंग विकलांग संस्था, डोंबिवली

## BHARARI ASTHIVYANGA VIKALANG SANSTHA, DOMBIVLI




२९वा वर्धापन दिन
**29th ANNIVERSARY**

स्मरणिका २०२५
**SOUVENIR 2025**

# क्षणचित्रे २०२४
















# थोडंसं मनातलं . . .

**- अमिता कोकाटे**



सर्व मित्र मैत्रिणींना नमस्कार......

भरारी अस्थिव्यंग विकलांग संस्थेविषयी बहुतेकांना माहिती आहेच, तरीही भरारीच्या गेल्या 29 वर्षांच्या प्रवासातील वाटचालीचा थोडक्यात धांडोळा.... 29 वर्षांपूर्वी श्री. विजय प्रधान उर्फ भाऊ प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली काही दिव्यांग व काही अव्यंग व्यक्ती एकत्र येऊन 'भरारी अ.वि. संस्थेची' स्थापना होऊन दिव्यांगांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक बाबींची पूर्तता करण्याच्या कामाला सुरूवात झाली.

अस्थिव्यंगांच्या गरजेतून एकत्र येण्याने सुरू झालेल्या ह्या संस्थेची वाटचाल पुढे हळू हळू व्यापक होत आपल्या उपक्रमांमध्ये 'कर्णबधिर, मतिमंद, दृष्टिहीन' इत्यादी दिव्यांगांनाही सामावून घेत सुरू आहे . संस्थेतर्फे दिव्यांगांना अत्यावश्यक 'अपंगत्व दाखले, रेल्वे सवलत प्रमाणपत्रे' उपलब्ध करून देणाऱ्या वैद्यकिय शिबिरांचे सातत्याने आयोजन करणे तसेच 'कॅलिपर्स, क्रचेस, स्प्लिन्टस् , व्हीलचेअर्स, तीन चाकी सायकली, श्रवणयंत्रे' इत्यादी साधने योग्य दर्जाची व वेळेत मिळावीत यासाठी हॉस्पिटल्स, तत्सम संस्थांमध्ये दिव्यांगांना घेऊन जाणे, त्याचप्रमाणे उदरनिर्वाहासाठी 'स्टॉल्स, घरघंटी, शिलाई मशिन्स' मिळवून देऊन स्वावलंबी बनवण्यासाठी सहाय्य करणे, अशी उपक्रमांची जंत्री थोडक्यात आहे.

दिव्यांगांच्या आर्थिक पुनर्वसनासाठीचे प्रयत्न करतानाच, त्यांच्या मानसिक - भावनिक - सामाजिक उत्थानाचीही काळजी घेऊन, दिव्यांग व्यक्ती जास्तीत जास्त सक्षम कशी होईल याकडे लक्ष दिले जाते. त्यासाठी संस्थेतर्फे सातत्याने विविध स्पर्धा-सहली, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांना चित्रपट - नाट्यप्रयोग, - सांगितिक कार्यक्रमांना घेऊन जाऊन समाजाशी संवाद घडवून आणला जातो, तसेच दिव्यांगांच्या जगण्यात-संघर्षात सहभागी असलेल्या कुटुंबियांनाही भरारी परिवारात सामावून घेऊन परस्पर संबंध दृढ करण्यावर भर दिला जातो.

मा. भाऊ प्रधान असतांना व त्यांच्या पश्चातही संस्थेची वाटचाल 'भरारी' नाव सार्थ करताना कार्याध्यक्षा डॉ. अंजली आपटे तसेच इतर अनेक आजी-माजी पदाधिकारी, संस्थेचे सेवाभावी कार्यकर्ते, सहृदयी हितचिंतक, देणगीदार ह्यांच्या सहाय्याने अनेक छोट्या- मोठ्या उपक्रमांची पूर्तता करत असते. 'अपंगालय-ज्येष्ठालय' हा असाच एक मोठा प्रकल्प सध्या भाड्याच्या जागेत सुरू असून; तिथे अंशतः दिव्यांग, पूर्णतः परावलंबी लहानथोर व्यक्ती तसेच जेष्ठ व्यक्ती (ज्यांची घरी काळजी घेण्यातील अपरिहार्य असमर्थता आहे अशा) त्याचप्रमाणे वैद्यकीय कारणास्तव अल्प काळासाठी संस्थेतील सेवा घेणे अपरिहार्य आहे, अशा सर्वांना निगुतीने-मायेने सेवा देणे, शारीरिक-मानसिक आधार देऊन शुश्रुषा करणे, इत्यादी कामात संस्थेतील कामसू सेवकवर्ग, संस्था समिती सदस्य, सेवाभावी कार्यकर्ते ह्यांचा खूप अगत्याने सहभाग असतो.

आता 'चिरड' येथील स्वतःच्या जागेत, संस्थेची स्वतःची वास्तू लवकर उभारण्याचं स्वप्न खूप जवळ येतंय.त्यासाठी परिचित, अपरिचित सर्वांच्या हातभाराची गरज आहे. संस्थेचे कार्यकारी मंडळ, कार्यकर्ते, लाईफ मेंबर्स, हितचिंतक हे सर्वजण खूप मनापासून ह्या स्वप्नपूर्तीसाठी प्रयत्न करत आहेत. जमेल तसे योगदान देत आहेत. यापुढेही असेच सर्वांचे सहकार्य 'भरारी' संस्थेसोबत कायम असेल हा विश्वास आहे. त्यासाठी आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार.

धन्यवाद!

आपली,
**अमिता कोकाटे**
अध्यक्षा
**भरारी अस्थिव्यंग विकलांग संस्था, डोंबिवली.**
कार्यकारी मंडळाच्या वतीने

# आपली 'भरारी'....

भरारी अस्थिव्यंग विकलांग संस्था दि. 3 डिसेंबर,1996 रोजी जागतिक अपंग दिनाच्या दिवशी स्थापन झाली. अपंगांना आत्मविश्वासाने जगता यावे ही संकल्पना प्रथम कै. विजय उर्फ भाऊ प्रधान व डॉ. अंजली आपटे यांच्या मनात साकार झाली व बारा अपंग व्यक्ति एकत्र येऊन भरारीची सुरूवात झाली,

**भरारी च्या कार्याचा माहितीपट संस्थेच्या वतीने तयार केला असून यासाठी खास भरारी गीत डॉ. प्रमोद बेजकर यांनी लिहिले असून श्री विश्वास पाटणकर यांनी संगीतबद्ध केले आहे.**

## आपण भरारीसाठी काय करू शकता ?

भरारी चे कार्यकर्ते होऊ शकता.
तुमचे कौशल्य व ज्ञानाचा भरारी ला उपयोग होईल.
अपंगांना नेहमी लागणारी साधने देणगी देऊ शकता.

## ऋणनिर्देश

भरारीच्या यशात सहभागी असणारे सभासद, हितचिंतक, सल्लागार, मार्गदर्शक, कर्मचारी, संचालक मंडळ, उपनिबंधक खाते, बँकर्स यांचे मोलाचे सहकार्य मिळत असते. तसेच लेखापरिक्षक यांनीही वेळोवेळी योग्य सल्ला दिला. लोढा हेवन, कल्याण-शीळ रोड, निळजे येथे अपंगालयाची सुरूवात झाली. सदर सदनिका डॉ. तारा नाईक व श्री. एम.एस.नाईक ह्यांनी सुरूवातीची सात वर्षे विनाअट उपलब्ध करून दिली म्हणूनच आम्ही येथवरची यशस्वी वाटचाल करू शकलो. त्याबद्दल भरारी अस्थिव्यंग विकलांग संस्था या सर्वांची ऋणी आहे, त्रिवार धन्यवाद !

## 'भरारी' विषयी अधिक माहिती व संपर्क

**भरारी अस्थिव्यंग विकलांग संस्था**
द्वाराः सीमा चंद्रकांत देशपांडे
शॉप नं.4, विपा सोसायटी,
रामवाडी, अगरवाल हॉलजवळ,
मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व)
जि.ठाणे 421201
मोबाईल क्र. 9167949320


**भरारी अपंगालय**
103-104, बि.नं. 14, लव्हेंडर,
रिजन्सी इस्टेट, कल्याण-शीळ रोड,
डोंबिवली (पूर्व) जि. ठाणे 421203
**सौ. संध्या प्रधान (खजिनदार)**
**मोबाईल क्र.: 9987067944**
**सौ. जयश्री बांदेकर (व्यवस्थापक)**
**मोबाईल क्र. : 9222816292**

**अमिता कोकाटे (अध्यक्ष) : 7738384538**
**डॉ. अंजली आपटे (कार्याध्यक्ष) : 9892072788**
**विनायक थत्ते (जनसंपर्क अधिकारी) : 9819633383**

.

email : bharariavs@gmail.com website : www.bharari.ngo

# पुण्यस्मरण



## विजय उर्फ भाऊ प्रधान

**- संस्थापक -**

**भरारी अस्थिव्यंग विकलांग संस्था, डोंबिवली**

## OUR 'BHARARI'

Bharari Asthivyanga Vikalanga Sanstha was established on 3rd December, 1996. "To enable the physically challenged persons through Creative Humanism was the thought in the minds of Late Bhau (Vijay) Pradhan, Dr. Anjali Apte with the 12 physically challenged persons it came into existence in the form of 'Bharari'.

A documentary about 'Bharari' is produced by the organization. An inspirational theme song 'Bharari' is written by Dr. Pramod Bejkar & tunes composed by Shri. Vishwas Patankar.

## What could I do for 'Bharari'

Can become a volunteer.....
Your skill & knowledge can be helpful....
Can donate for daily equipments for physically challenged....

## ThankYou!

There is a valuable support from members, volunteers, consultants, guides, employees, directors, registrars, bankers to 'Bharari'. The auditors also gives appropriate advice from time to time. Bharari Apangalaya was started at Lodha Heaven, Nilje initially in the premises owned by Dr. Tara & Mr. M.S. Naik without restrictions, thats why we could progress. 'Bharari Asthivyanga Vikalang Sanstha' is grateful to all the above people. **Thank you very much !**

**More contact information about 'Bharari'**

**Bharari Asthivyanga Viklanga Sanstha, Dombivli**
C/o Seema Chandrakant Deshpande
Shop No.4, Vipa Society, Ramwadi,
Near Agarwal Hall, Manpada Road,
Dombivli (E), Dist Thane
Mob : 9167949320

**Bharari Apangalaya**
103-104, B.No. 14, Lavender,
Regency Estate, Kalyan Sheel Road,
Dombivli (E), Dist. Thane 421203.
**Mrs. Sandhya Pradhan (Treasurer)**
**Mob. 9987067944**
**Mrs. Jayashree Bandekar (Manager)**
**Mob : 9222816292**

**Amita Kokatay (President) Mob : 7738384538**
**Dr. Mrs. Anjali Apte (Working President) Mob : 9892072788**
**Vinayak Thatte (P.R.O.) Mob : 9819633383**

email : bharariavs@gmail.com website : www.bharari.ngo

# वाटचाल...२०२४-२०२५

- 01-12-2024 - 28वा वर्धापन दिन संपन्न
- 03-12-2024 - जागतिक अपंग दिन साजरा करण्यात आला.
- भारती मुश्रीफ, क्षितिजा कोठारे, डॉ. अंजली आपटे यांनी घरकूल संस्थेला भेट दिली.
- 05-12-2024 - सायंकाळी 5 वाजता मिलींद कठाळे, भारती मुश्रीफ, किशोर मुश्रीफ आले होते. संगीताचा कार्यक्रम संपन्न झाला.
- 26-12-2024 - मार्गशीर्ष गुरूवार साजरे (व्रत) झाले.
- 26-12-2024 - इनरव्हील क्लब, ठाणे यांनी सदिच्छा भेट दिली.
- 02-01-2025 - विलास नरे यांचा वाढदिवस साजरा केला.
- 24-01-2025 - संक्रांतीचा तिळगूळ व हळदी-कुंकू समारंभ झाला.
- 20-02-2025 - गजानन महाराज प्रकट दिन साजरा केला. गजानन विजय ग्रंथाचे पारायण अनुराधा पेंडसे व श्री. विनायक लेले यांनी केले.
- 27-02-2025 - सुलोचना दिदी यांचेकडून वाढदिवसा निमित्त धान्य दिले.
- 02-03-2025 - पार्थ दासानी यांच्या वाढदिवसा निमित्त केक, वेफर्स व बिस्कीटांचे वाटप करण्यात आले.
- 08-03-2025 - जागतिक महिला दिनानिमित्त खुशबू दासानी यांनी पाणी-पुरीचा ठेला लावला. सगळयांनी शेवपूरी, रगडा पॅटीस, पाणीपुरी यांचा मनमुराद आनंद घेतला.
- 11-03-2025 - स्नेहांकिता भारतीय चां.का.प्र.मध्यवर्ती स्त्री संस्था- सौ. संध्या प्रधान यांचेमार्फत सदिच्छा भेट दिली.

  पराठे, चटणी, पुलाव, सॅलड असा बेत होता. प्रथम पन्हे देऊन सर्वांचे स्वागत करण्यात आले.
- 30-03-2025 - शोभा यात्रा - रिक्षा सजवून भरारीचे बॅनर लावले. सकाळी 7 ते 12 शोभायात्रा होती. अपंगालयातील सदस्य व भरारी कमिटी सदस्य तसेच इतर अपंगांचा यामध्ये सहभाग होता.
- 06-04-2025 - रामनवमी उत्सव साजरा केला. पाळणा सजवून पुजाअर्चा केली, प्रसाद म्हणून सुंठवडा देण्यात आला.
- 13-04-2025 - उषा भावे यांची पणती जानकी आर्चित भावे हिचा वाढदिवस साजरा करण्यात आला. दुपारचे भोजन दिले.

- 18-06-2025 - वार्षिक श्री सत्यनारायण महापूजा झाली. यजमान श्री व सौ. तुळपुळे होते. सौ. सविता आपटे यांनी पौरोहित्य केले. श्री व सौ. सोपले मेहूण म्हणून उपस्थित होते. डॉ. श्री. व सौ. अरूण पाटील उपस्थित होते. सीमा जोग यांनी महाप्रसाद व मसाले भात केला.
- 04-07-2025 - टिळकनगर जेष्ठ नागरिक संघ, डोंबिवली यांचेतर्फे हास्यक्लबचा कार्यक्रम झाला. मीराताई कुलकर्णी, विनायक थत्ते, सौ. प्रतिभा थत्ते यांनी कार्यक्रम उत्तम प्रकारे साजरा केला.
- 06-07-2025 - आषाढी एकादशी निमित्त श्री. विनायक लेले यांनी विठ्ठल रखुमाईंची आकर्षक मुर्ती भेट दिली. सर्वांनी मनोभावे पूजा केली. फेर धरून सगळयांनी संतमेळा साजरा केला.
- 24-07-2025 - दीप अमावस्ये निमित्त सर्व दिवे स्वच्छ घासून पूजा केली. मंगल वातावरणात उत्सव साजरा झाला.

  इनरव्हील क्लब, डोंबिवलीच्या अध्यक्षा नम्रता नाईक यांचा वाढदिवस झाला. तसेच ध्यान धारणेचा कार्यक्रम झाला.
- 02-08-2025 - सौ. तृप्ती केळकर यांचेकडून श्रावणी शुक्रवार निमित्त पुरणपोळीचे जेवण दिले.
- 05-08-2025 - कुमुदिनी वडदकर यांचा 88वा वाढदिवस साजरा झाला. अननस शिरा, बटाटे वडे, मसाले असा मेनू होता।
- 25-08-2025 - श्रावणमास निमित्त 'ॐनमः शिवाय' जप (एक लक्ष) पूर्ण केला.
- 27-08-2025 - दीड दिवसाचा गणपती उत्सव साजरा केला. आरास खुप छान झाली होती. अनुराधा पेंडसे यांचे जावई श्री. मोडक यांनी मखर डोनेशन दिले होते. श्री. अजित प्रधान व सौ. संध्या प्रधान यांनी आरती केली.
- 22-09-2025 - नवरात्र घटस्थापना करण्यात आली. देवीचा जप व महालक्ष्मी स्तोत्र याचे नऊ दिवस पठण करण्यात आले.
- 23-09-2025 - सरस्वती भजनी मंडळाचा कार्यक्रम झाला. भजन अतिशय सुश्राव्य झाले. उपवास चिवडा व कॉफी भगिनींना वाटप करण्यात आली. कार्यक्रमास विनायक थत्ते, सीमा देशपांडे, सीमा जोग उपस्थित होते.
- 02-10-2025 - विजया दशमी निमित्त श्रीखंड पुरीचे जेवण दिले. सायंकाळी सोने लुटण्याचा कार्यक्रम झाला.
- 28-10-2025 - वसुबारस, धनतेरस, नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, भाऊबीज उत्साहात साजरे झाले, सौ. बिवलकर , सोनटक्के आजींची मुलगी यांचेतर्फे फराळ देण्यात आला. अपंगालयात करंज्या, लाडू, चिवडा असा फराळ बनविला होता.

# "भरारी अपंगालयाची दिनचर्या"

अपंगालयाची सकाळ ही पहाटे 4.30 वाजता होते. भावे आजी प्रातःविधीसाठी उठतात. मग हळूहळू एकेक जण उठायला सुरूवात होते. सेवक वर्गाचा आवाज चालू असतो. गरम पाणी घ्या, चूळ भरा या आवाजाने सगळे जागे होतात. हळूच पांघरूण काढून आपल्या कडे कोण येत आहे हे बघतात.

क्रमाक्रमाने आंघोळीचा कार्यक्रम सुरू होतो. सकाळचा चहा येतो. बेडवरची स्वच्छता होते. चादरी पांघरूण घडी घातली जातात. हा सगळा कार्यक्रम 8 पर्यंत पूर्ण होतो. अर्ध्या तासाने नाष्ट्याची वेळ होते. 9.30 पर्यंत नाष्टा सुरू असतो. एखादीला नाष्टा आवडला नाही तर उपमा, साधे पोहे, दुधपोहे देतात. मधेच एखादी म्हणाली मला चमचाभर जास्त घाल.तर लगेच सेवक वर्ग देतात. नाष्ट्याचे एकंदर 15 प्रकार आहेत. महिन्यातून एक प्रकार दोनदा केला जातो. 10 वाजता पेशंट आपली स्वतःची कामे आवरायची सुरूवात करतात. कोणी केस विंचरतय, कुणी पावडर लावतय, कुणी टिकली लावत आहेत. नंतर कोणाला औषध दिल जातय एक ना दोन अनेक कामे चालू असतात.

10.30 वाजता सोपले काका सत्संगासाठी येतात. म्हणून सगळे 10 मि. आधी हॉलमध्ये खुर्चीत येऊन बसतात. "श्री गणेशाय नमः" असा जप सुरू होतो. त्यानंतर अनेक जप, स्तोत्र व देवादिकांच्या कथा काका सांगतात. नंतर आरती करून श्री गुरूदत्ताना प्रसाद दाखवून सत्संग 11.30 ला समाप्त होतो. 5 मिनिटांनंतर विस मिनिटे बासरी वाद्याच्या साथीने ध्यानधारणा होते. ध्यानधारणेमुळे सगळयांना खुपच उत्साह वाटतो. लगेच "श्रीराम जय राम जय जय राम" नामाचा सामूहिक जप होतो. जप झाल्यावर खेळ, व्यायाम व हास्यक्लब यापैकी काहीतरी एक केले जाते.

12.30 ला गरम भोजनाचा सगळे आस्वाद घेतात. जेवणानंतर औषधे दिली जातात. दुपारच्या वेळी कोणी गप्पा मारतात, टीव्ही बघतात, पत्ते खेळतात. मग थोडा वेळ झोप. 4.00 वाजले की गरम चहा-बिस्कीटे. मग फेऱ्या मारणे, गप्पा गोष्टी होतात. 6.00 वाजले की हलका नाश्ता देतात. उदा. ज्यूस, फळे, भेळ इत्यादी दिले जाते.

संध्याकाळी दिवे लागणीला देवासमोर दिवा लावून खामकर आजी 'रामरक्षा' म्हणतात. मग थोडावेळ टीव्ही बघण्याचा कार्यक्रम चालू असतो.


रात्री 8 ते 9 या वेळेत गरम ताजे जेवण होते. जेवण झाल्यावर सेवक वर्ग रेलिंग लावणे, चादरी घालणे, पांघरूण घालणे इ. कामे करतात. मग औषधे देणे, पाणी देणे. 10.30 वाजता लाईट बंद होतात आणि सगळे झोपी जातात. शुभरात्री !



कै. श्रीमती कुंदा वाटवे

## भावपूर्ण श्रद्धांजली





कै. श्री. रमेश जोशी

## एक वार पंखावरूनी फिरो तुझा हात . . .

सत्यघटना आहे. 71...72 सालची. निम शहरी भागातील एक महाविद्यालय. महाविद्यालयाचे प्राचार्य होते श्री. वैद्य सर. मी त्याच महाविद्यालयातील. वैद्य सर म्हणजे अतिशय उमद व्यक्तिमत्व. वाङमयामध्ये कोणी त्यांचा हात धरू शकत नव्हत. वक्तृत्व, नाट्य, संगीत, क्रीडा, पर्यटन अशा सर्व क्षेत्रात महाविद्यालय, जिल्ह्यात अग्रणी होते. आमचा संबंध केव्हा यायचा, एखादे प्राध्यापक आलेले नसतील तर सर स्वतः आमच्या वर्गावर यायचे आणि आल्यापासून, तास कधी संपला हे सुद्धा कळायचेच नाही. शिकवण्याची हातोटी तर होतीच पण मुलांना सामान्य ज्ञान उमजावे म्हणून तळमळीने प्रयत्न असायचा, त्यावेळी नवीन आलेली घडीची छत्री, ही कशी वापरावी, कशी उघडावी, बंद करावी हे त्यांनी आम्हाला वर्गात छत्री आणून दाखविले होते. मी कॉलेज मध्ये प्रवेश घ्यायला गेले (अकरावीला मी मुलींमधून जिल्ह्यात प्रथम आले होते) तेव्हा मी आले आहे असं बघून त्यांनी मला त्यांच्या प्राचार्यांच्या केबिनमध्ये बोलावून घेतलं आणि तू सायन्स शाखेला प्रवेश घे आणि तुझ्यासाठी माझ्या मुलीचा पुस्तकांचा सेट ठेवला आहे, असं सांगितलं होतं. सायन्स म्हणजे जास्त खर्च असे जर तुला वाटत असेल तर हा भार आम्ही हलका करू इच्छितो हा संदेश त्यांनी मला दिला होता. असे सर्वांना आवडणारे, शिस्तप्रिय, पण अतिशय कुशलतेने शिक्षण संस्था चालविणारे, असे ते प्राचार्य होते. गाव तसं छोटं. त्यावेळच्या काळानुसार राजकारण थोडं डाव्या अंगाने चालणार होतं, पण शिक्षणाच्या क्षेत्रातील असे जे नामवंत होते त्यांच्याबद्दल आदर राखणार होतं.

गावात काही विध्वंसक शक्ती कार्यरत होत्याच, आणि त्यांच्यातील ज्येष्ठ मंडळी निवर्तली होती, कारभार सगळा युवक मंडळींच्या हातात होता. विशेष म्हणजे अजाण युवकांच्या आणि कर्मधर्म संयोगाने एकदा असा हा एक युवक वैद्य सरांच्या शिस्तीमुळे, मानभंग झाल्यासारखा दुखावला गेला. माथेफिरू युवकच ते...झाले, निमित्त व्हायला कारण झाले आणि कॉलेजमध्ये संप पुकारला गेला. आमच्यासारख्या काही सरळ मार्गी युवकांनी संप फोडण्याचा प्रयत्न केला, पण तो निष्प्रभ ठरला. गावातील काही सामाजिक प्रतिष्ठित पुढाऱ्यांनी एकत्र येऊन, सरांच्या बाजूने निर्दोष भूमिका मांडून विषय संपवला. पण अगदी लगेचच एक दिवस सकाळी बातमी आली, वैद्य सरांनी राजीनामा दिला आहे आणि त्यांच्याच बरोबर बरेचसे प्राध्यापक कॉलेज सोडून जात आहेत. आम्ही सारे विद्यार्थी-विद्यार्थिनी, म्हणजे मी पण, कॉलेज मध्ये गेलो, कॉलेजमधले वातावरण अतिशय गंभीर, सुन्न करणारं होतं. सरांनी या कॉलेजसाठी त्यांच्या आयुष्यातील क्षण अन् क्षण वेचला होता. त्यांच्या रक्ताचा थेंब अन थेंब या कॉलेजच्या प्रगतीसाठी खर्च केला होता. त्या कॉलेजच्या इमारतीच्या शेवटच्या पायरीवर बसून सर सरस्वती कडे तोंड करून अखेरचा दंडवत घालीत होते आणि म्हणत होते, ''एकदाच पंखावरूनी फिरो तुझा हात, शेवटले घरटे माझे तुझ्या अंगणात''.

**- सौ. रेखा विजय जोशी**

## विनम्र आवाहन. . .

भरारी ने मौजे चिरड, खोणी - तळोजा रोड, ता. अंबरनाथ येथे 22 गुंठे जागा विकत घेतली आहे, तेथे सुसज्ज अपंगालय,डे केअर सेंटर,वर्कशॉप, प्रशिक्षण केंद्र असा प्रकल्प उभा राहणार आहे. त्यासाठी अधिकाधिक आर्थिक मदतीचे आवाहन आहे. या देणग्या आयकर कायद्याअंतर्गत 80जी सवलतप्राप्त आहेत. देणगीचे चेक्स-ड्राफ्ट 'भरारी अ.वि. संस्था, डोंबिवली' या नावे काढावा. आपण भरारी च्या खात्यात नेट बँकिंगद्वारेही देणगी जमा करू शकता.

## An Appeal For Donations ...

Bharari has purchased 22 gunthas at Moje Chirad, Khoni -Taloja Road, Ambernath. There will be a project with Apangalaya, Day Care Centre,Well equipped Workshop and Training Centre. There is an urgent need for financial help.These donations are avaiable under 80G Tax exemptions under the Income Tax Act. Donation Cheques/Drafts drawn by name "Bharari AV sanstha, Dombivli" You can add donations through Net Banking to Bharari account.

**Dombivali Nagri Sahakari Bank A/c No. 002010100064048 IFSC : DNSB0000002**
**Bank of India A/c No. 009510100029317 IFSC BKID0000095**
**If you pay direct to the A/c, Please share the screen shot.**

दिनकर पुरूषोत्तम खरे 86,098

अंजली मधुकर चक्रदेव 51,000

डॉ. वीणा गडकरी 50,000

सुभाष वासुदेव आगरकर 50,000

कन्ट्रोलवेल इंडिया प्रा.लि. 50,000

प्लासमेक इंजिनिअरींग प्रा.लि. 50,000

# संस्थेचा प्रमुख प्रकल्प आहे अपंगालय –ज्येष्ठालय

सुरूवातीची सात वर्षे डोंबिवली नजिकच्या लोढा हेवन, निळजे या ठिकाणी डॉ तारा नाईक यांनी संस्थेच्या प्रेमाखातर देऊ केलेल्या ब्लॉकमध्ये अपंगालय सुरू होते. आता ते 103-104, बिल्डींग नं. 14, लव्हेंडर, रिजन्सी इस्टेट, कल्याण-शीळ रोड, डोंबिवली (पूर्व) येथे सुरू आहे. अपंगालय म्हणजे अपंगांचे घर. जे घर प्रत्येक अपंगाला वावरायला सोयीचं असेल, जिथे पूर्णतः परावलंबी अपंगांचा/ज्येष्ठांचा मानाने, प्रेमाने व सेवाभावी वृत्तीने सांभाळ केला जाईल ही प्रमुख संकल्पना! निसर्गरम्य असलेल्या या प्रशस्त जागेत निवास व मनोरंजनाबरोबरच फिजिओथेरपी, ऑक्युपेशनल थेरपी दिली जाते. शिवाय या ठिकाणी तात्पुरत्या काळासाठीही अपंगांची राहण्याची सोय करण्यात येते. संस्थेने ‘चिरड’ येथे स्वतःची जागा घेतली आहे. ह्या ठिकाणी नवीन होणा-या वास्तुमध्ये हेल्थ केअर सेंटर, डे केअर सेंटर, तसेच अपंगांना लागणा-या विविध गोष्टींचे वर्कशॉप सुरू करण्यात येईल. डे केअर सेंटर म्हणजे अपंग व्यक्तीला, तिच्या घरून आणून पूर्ण दिवसभर त्या व्यक्तीची शारिरीक व मानसिक काळजी घेऊन संध्याकाळी त्या व्यक्तीला पुन्हा घरी नेऊन सोडण्यात येईल.

**अपंगालयातील प्रवेशासंबंधी :** संस्थेतील तज्ज्ञ व जबाबदार डॉक्टर पेशंटची शारिरीक व मानसिक अवस्था बघून प्रवेश देऊ अथवा नाकारू शकतात. प्रवेशाच्या वेळी काही चाचण्या करून घेणे बंधनकारक आहे, पेशंटच्या शारिरीक अवस्थेनुसार त्याच्याकडे द्यावे लागणारे कमी-अधिक लक्ष यानुसार मासिक शुल्क ठरते. तसेच प्रवेशाच्या वेळी संस्था काही रक्कम अनामत म्हणून घेते. वास्तव्य काळात पेशंटचे निधन झाल्यास अथवा पेशंट कायमस्वरूपी घरी गेल्यास ही रक्कम परत मिळते.

**अधिक माहिती व प्रवेशासंबंधी संपर्क साधा :**

**अध्यक्ष -** अमिता कोकाटे - 7738384538 **कार्याध्यक्षा -** डॉ. अंजली आपटे - 9892072788

**जनसंपर्क अधिकारी -** विनायक थत्ते - 9819633383 **खजिनदार -** सौ. संध्या प्रधान - 9987067944

**The major project of Bharari - ‘Apangalaya / Jyeshthalaya’!**

We started this project in 2003 at Lodha Heaven, Nilje, Near Dombivli in the premises offered to us by Dr. Tara Naik, After seven years we shifted it to the present location at 103/104, Bldg No. 14, Lavender, Regency Estate, Kalyan Sheel Road, Dombivli (East) The Apangalaya is functioning in this spacious place .

Apangalaya is the home for the physically challenged persons! A home suitable for their barrier free movements. The Concept behind this home is to shelter any person/senior citizen with total disability. They are looked after with utmost care. We provide not only the accomodation and food but also the physiotherapy and occupational therapy to the residents. We even offer here the facility of short duration stay for physically challenged person. We have recently purchased a land at village Chirad, Taloja MIDC Road, for Apangalaya project. The proposed project consits of apangalaya, Health Care Centre, Day care centre, Workshop for repairing and producing various items required by physically challenged people etc. The concept of Day care centre is to bring a physically challenged person from home in the morning, take his/her care the whole day and drop back to home in the evening.

**Admission in Apangalaya :** Doctors on Bharari's panels inspect the applicants for their physical & mental condition. Some medical tests are mandatory before admission. Admission is the sole discretion of Bharari’s panel, Monthly charges and other charges are decided upon the physical condition of the patient. Additionally, some amount is also accepted as deposit at the time of admission. This deposit is retruned in case the patient is departed/discharged from Apangalaya.

**For More Contact :**
**Amita Kokatay (President) Mob : 7738384538**
**Dr. Anjali Apte (Working President) Mob : 9892072788**
**Vinayak Thatte (P.R.O.) Mob : 9819633383 - Sandhya Pradhan (Treasurer) Mob. : 9987067944**

## विशेष हार्दिक आभार... विशेष हार्दिक आभार...

सातत्याने दरमहा आर्थिक मदत करणारे श्री. प्रमोद श्रोत्री व क्रांती येवले

लव्हेंडर येथील जागेसाठी मोलाची मदत करणाऱ्यांचे आभार ...
सौ. रेश्मा मनिष जोशी, लव्हेंडर मधील सर्व रहिवासी व पदाधिकारी यांचे आभार

## त्रिवार धन्यवाद

ब-याच मोठ्या समारंभाप्रसंगी भरारीला आपली जागा सहज वापरण्यास देणारे
देवदत्त आपटे (दीपदत्त), देशपांडे कुटुंबिय (विपा सोसायटी),
प्रफुल्ल तेरसे (राजगार्डन सोसायटी)
ह्यांचेही आम्ही अत्यंत आभारी आहोत. धन्यवाद ! त्रिवार धन्यवाद !!

## हार्दिक अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा !!

भरारी परिवाराशी निगडीत असलेल्या विद्यार्थी मित्र-मैत्रिणींचे यशाबद्दल अभिनंदन
व येणा-या परीक्षांसाठी शुभेच्छा.

## एकोणतीसावा वर्धापन दिन, दि. ०७ डिसेंबर, २०२५

स्वयंवर हॉल अल्प दरात उपलब्ध करून देणारे - श्री. स्वप्नील किरकिरे यांचे हार्दिक आभार.

### अल्पोपहार

श्री. कुमार भालके व कै. नारायण विष्णू आणि सुमित्रा नारायण बापट यांचे स्मरणार्थ

### जेवण

कै.शमा गोखले स्मरणार्थ आणि कै. निलिमा स्मरणार्थ

### ‘भाऊ तेथे खाऊ’ पाककला स्पर्धेची पारितोषिके

श्री. विक्रम व विराज प्रधान यांचेतर्फे

### वर्धापन दिन स्पर्धांची पारितोषिके

श्रीधर जोशी, डॉ. अरूण पाटील, दिशा स्कीन अँड लेझर इन्स्टिट्यूट यांचेतर्फे

भाग्यश्री दत्तात्रय मराठे यांच्याकडून वर्धापन दिनासाठी हॉलचे भाडे

## भरारी व अपंगालय प्राप्त देणग्या 2024-2025

| | |
|---|---|
| अच्युत स. खरे | 25,000 |
| डॉ. प्रतिभा गोखले | 25,000 |
| इनरव्हील क्लब,डोंबिवली(पू) | 21,000 |
| सुनिता शिधये | 20,000 |
| विद्या गजानन बर्वे | 20,000 |
| स्नेहांकिता भारतीय | 11,000 |
| चां.का.प्र.मध्यवर्ती स्त्री संस्था | |
| वैशाली ना. लव्हाटे | 11,000 |
| कै. नारायण लव्हाटे स्मरणार्थ | |
| एक हितचिंतक | 11,000 |
| जयश्री जयंत कोन्हालकर | 11,000 |
| अनिल पांडे | 11,000 |
| कै. शार्दुल पांडे स्मरणार्थ | |
| अनुराधा सिंग | 11,000 |
| मुकुंद खाडीलकर | 10,000 |
| सुवर्णा | 10,000 |
| हेमंत मु. करंदीकर | 10,000 |
| गणेश मुद्रा | 10,000 |
| वसंत गो. देशपांडे | 10,000 |
| कै. विनय देशपांडे स्मरणार्थ | |
| निमेश मुखर्जी | 10,000 |
| विनायक कृ. मेहेंदळे | 10,000 |
| जितेश रामनाथ मढवी | 10,000 |
| स्वाती सोनटक्के | 10,000 |
| कल्पनाविहार म. मंडळ | 10,000 |
| याज फाऊंडेशन | 10,000 |
| सावंत | 10,000 |
| मुकुंद खाडीलकर | 10,000 |
| यशवंती | 10,000 |
| प्रल्हाद जोशी | 10,000 |
| इनरव्हील क्लब ऑफ ठाणे वेस्ट | 7,000 |
| स्नेहबंधन सीकेपी महिला मंडळ | 6,500 |
| अंजली आपटे/ क्षितिजा कोठारे | 6,101 |
| शुभांगी काटदरे | 6,051 |
| सुनिता शिधये | 6,000 |
| प्रमोद श्रोत्री | 6,000 |
| अनुराधा प. बुरकुले | 6,000 |
| विकास दि. पाटकर | 6,000 |
| प्रमोद श्रोत्री | 6,000 |
| कै. रामचंद्र श्रोत्री स्मरणार्थ | |
| अभय प्र. भावे | 6,000 |
| कै. प्रतिभा भावे स्मरणार्थ | |
| संध्या माधव जोशी | 5,555 |
| प्रकाश वैद्य | 5,002 |
| अभिजित फाटक | 5,001 |
| वेब ग्राफीक्स | 5,001 |
| श्रीधर पंडीत | 5,001 |
| विकास ज. प्रधान | 5,001 |
| मंगला शरद सोमण | 5,001 |
| स्वाती अशोक कामथ | 5,001 |
| जयश्री सुधाकर पाटील | 5,001 |
| प्राची महेंद्र रिसबुड | 5,001 |
| एक हितचिंतक | 5,000 |
| धनंजय पेंढारकर | 5,000 |
| डॉ. बी. आर. अग्रवाल | 5,000 |
| सर्वेश कयाळ | 5,000 |
| विजय चि. वीरकर | 5,000 |
| सविता अनिल आपटे | 5,000 |
| संध्या अ.एडगांवकर | 5,000 |
| श्री चित्रावली महीला मंडळ | 5,000 |
| चंद्रकांत लोखंडे | 5,000 |
| मिना वि.ढापरे | 5,000 |
| राजेंद्र प. पटवर्धन | 5,000 |
| सुचेता प्रकाश पेठे | 5,000 |
| अनिल शं. आपटे | 5,000 |
| रेखा भावे | 5,000 |
| अशोक पु. कामथ | 5,000 |
| मनोज डी. विश्वकर्मा | 5,000 |
| केदार व्ही दाणी | 5,000 |
| रेणुका स. कामथ | 5,000 |
| प्रकाश ताम्हणे | 5,000 |
| पूजा फुलाजी कदम | 4,011 |
| रंजन साळुंखे | 4,000 |
| कै. आशालता कार्वेकर स्मरणार्थ | |
| डॉ. गौरी बांदोडकर | 4,000 |
| ओमकार देवास्कर | 4,000 |
| विजया सु. वाणी | 3,000 |
| विकास म. म्हामुणकर | 3,000 |
| विद्या विकास घैसास | 2,500 |
| शिरीष कुलकर्णी | 2,500 |
| श्रीकांत | 2,500 |
| एक हितचिंतक | 2,500 |
| चारूलता फलटणकर | 2,500 |
| अनुजा आपटे | 2,500 |
| शितल प. गोखले | 2,100 |
| सायली अ. कुलकर्णी | 2,000 |
| कै. प्रभाकर व कै. माधवी कुलकर्णी स्मरणार्थ | |
| एक हितचिंतक | 2,000 |
| माधुरी गु. गुंजीकर | 2,000 |
| शाल्मली एस. खर्शीकर | 2,000 |
| सविता अनिल आपटे | 2,000 |

| | |
|---|---|
| अमरेंद्र ग. पटवर्धन | 2,000 |
| कै. गजानन पटवर्धन स्मरणार्थ | |
| शोभा मा. धोपेश्वरकर | 2,000 |
| सुधीर दि. आपटे | 2,000 |
| सविता अनिल आपटे | 1,500 |
| रमया अय्यर | 1,500 |
| सरस्वती भजनी मंडळ | 1,500 |
| सविता अनिल आपटे | 1,500 |
| सिमा जोग | 1,120 |
| विनायक वि. लेले | 1,101 |
| अद्वैत दुबे | 1,100 |
| नयना ठाकूर | 1,100 |
| सविता अनिल आपटे | 1,100 |
| सुगंधा अशोक दिघे | 1,100 |
| अभय परब | 1,002 |
| सतिश सुंठणकर | 1,001 |
| राजेंद्र श. धबडे | 1,001 |
| जयश्री बांदेकर | 1,001 |
| अद्वैत श्री. बिवलकर | 1,001 |
| विकास ज. प्रधान | 1,001 |
| सौ. अनुराधा कोगेकर | 1,001 |
| अमिता ढापरे | 1,001 |
| सिमा डिंगणकर | 1,000 |
| विनायक द. वैद्य | 1,000 |
| वसंत टी. बालिगा | 1,000 |
| जिग्नेश शाह | 1,000 |
| विलास काळे | 1,000 |
| दैदिप आर. डेरे | 1,000 |
| राहूल काळे | 1,000 |
| सिमा जोग | 1,000 |
| कै. श्रीकांत जोग स्मरणार्थ | |

| | |
|---|---|
| अविनाश प्र. पाटील | 1,000 |
| उज्वला विकास दळवी | 1,000 |
| तन्मय खर्शिकर | 1,000 |
| रूपा अजय देशमुख | 1,000 |
| श्रावणी एस. जाधव | 1,000 |
| ज्योती पी. शेट्टी | 1,000 |
| दीपा गुप्ते | 1,000 |
| अनुजा भावे | 1,000 |
| प्रदीप घैसास | 1,000 |
| विनायक थत्ते | 1,000 |
| अविनाश प्र. पाटील | 1,000 |
| डॉ. मंगल मुखर्जी | 1,000 |
| सरस्वती भजनी मंडळ | 1,000 |
| किर्ती श्री. बिवलकर | 1,000 |
| गंगा हेगडे | 1,000 |
| श्रीकांत सि. गद्रे | 810 |
| देवयानी कुलकर्णी | 580 |
| मिलिंद कठाळे | 501 |
| सुरेश टी. बालिगा | 501 |
| रश्मी सुधीर पवार | 501 |
| साधना जोशी | 501 |
| मीरा कुलकर्णी | 501 |
| शिवाजी आ. शिंदे | 501 |
| प्रशांत वैद्य | 501 |
| रेखा अ. नातु | 501 |
| जगदीश यादव | 501 |
| श्रीराज एस साठे | 501 |
| कोलते | 501 |
| सौम्या भल्ला | 501 |

| | |
|---|---|
| अनुराधा बुरकुले | 500 |
| प्रकाश चितळे | 500 |
| प्रभाकर सोमण | 500 |
| विलास आरणके | 500 |
| विठ्ठल मुंगी | 500 |
| स्वाती रा. सोमण | 500 |
| चित्रा घोडके | 500 |
| सिमा राम जोशी | 500 |
| प्रकाश गायकवाड | 500 |
| प्रेमलता के. देशपांडे | 500 |
| क्रीशिव रा. आचार्य | 500 |
| मिना मारू | 500 |
| पल्लवी मुक्कु | 500 |
| प्रिती उतेकर | 500 |
| कविता पाटकर | 500 |
| गीता एस. सिंग | 500 |
| शिल्पा म्हापसेकर | 500 |
| अरविंद राजसेकर | 500 |
| शेखर एस. गोडबोले | 500 |
| कमलेश टाक | 500 |
| मीरा गोरे | 500 |
| कै.मंगला साठे स्मरणार्थ | |
| प्रकाश गायकवाड | 500 |
| सतिश शाह | 300 |
| शुभदा पु. कर्वे | 251 |
| नीता कोपरकर | 251 |
| सिंधु पाटील | 250 |
| आशालता व. महाजन | 250 |
| सुनिल कुलकर्णी | 202 |
| हेमांगी चेतन व्होरा | 201 |

## आम्ही आभारी आहोत ! आम्ही आभारी आहोत !! आम्ही आभारी आहोत !!!

### संस्था - कार्यालये - व्यावसायिक ...

| | | |
|---|---|---|
| टिळकनगर शिक्षण प्रसारक मंडळ | ज्येष्ठ नागरिक संघ,डोंबिवली | गणेश मंदीर संस्थान |
| आश्रय ट्रस्ट | सिव्हिल हॉस्पिटल, ठाणे | डोंबिवली नाग.सह,बँक लि. |
| बँक ऑफ इंडिया, डोंबिवली | डोंबिवली पोलीस स्टेशन | सावित्रीबाई फुले नाट्यगृह |
| मानपाडा पोलीस स्टेशन | सेंट्रल हॉस्पिटल, उल्हासनगर | मयुरेश डिजिटल प्रिंटींग (बॅनर्स) |
| उर्जा फाऊंडेशन | रोटरी क्लब | इनरव्हील क्लब |
| सुसेवा एन जी ओ क्लिनिक | पाटकर ट्रस्ट | |

### विविध क्षेत्रातील मान्यवर ...

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. सदानंद थरवळ | श्री. उदय कर्वे | आ. राजू पाटील | श्री. सुधीर जोगळेकर |
| श्री. शरद उर्फ तात्या गंभीरराव | श्री. तात्यासाहेब माने | सौ. जयश्री कर्वे | श्री. स्वप्नील किरकीरे |
| श्री. रामनाथ सोनावणे | श्री. राजेश मोरे | श्री. भा. गो. म्हात्रे | श्री. मनोज घरत |
| सौ. मंगला सुळे | श्री. राहूल कामत | श्री. राहूल दामले | श्री. विश्वजीत पवार |
| श्री. जयंत पित्रे | श्री. महेश गुप्ते | श्री. प्रवीण दुधे | श्री. भगवान मंडलिक |
| श्री. अभय कोठारे | श्री. विश्वनाथ बिवलकर | श्री. प्रमोद सामंत | श्री. संजीत वायंगणकर |

## नेहमीचे तत्पर सहकारी. . .

श्रेयस श्रृंगारपुरे, प्रसाद जठार, संतोष मोरे, प्रकाश गायकवाड, श्री. सलिल पाटणकर, डॉ. रविंद्र पालकर, महेश मुंगी, श्री.संजीव मांद्रेकर, श्री. मामा शिर्के, अच्युत देसाई, श्री. विनय लिमये, अलंकार सावंत, श्री. मोहन तुळपुळे, श्री.चंद्रशेखर बेजकर, श्री. मिलींद पाटणकर, प्रदीप मेहता, शमा धोपेश्वरकर, सौ. राजश्री जोशी, सौ. मानसी भावे, श्रीमती वाणी, सौ. माधवी पाटणकर, सौ. भारती सावंत, सौ. गीतांजली मालवणकर, देवकी कोकाटे, जयेश जोशी, श्री. कांचन चौहान व शाम चौहान, आझाद खान, नवनाथ पाटील, यादव, शिवा निचरे, रघुवीर, जगदीश यादव, भारती मुश्रीफ, दीपक चव्हाण, वीणा जोशी, मनाली आपटे, श्री. संजय, सौ. नीता कोपरकर, ग्लोबल मालवणी - विजय पांचाळ, एकनाथ दुदवाडकर, प्रसाद पवार, सतीश गुजर, सचिन आचरेकर, श्रृती उरणकर,तन्मयी व तेजस उरणकर, सौ. सुनिता महाडिक देसाई, शिवानी जोग, मृगा गोरे, मीना देढिया, सुचित्रा सामंत, विपुल वैद्य, दिपाली ग्रीन, शोभा लेले

## भरारी व अपंगालय वस्तुरूप देणग्या(२०२४ ते २०२५)

सुशिला ठाकूर
केअर बायोमेडिकल (मुंबई)
सतीश शहा
अनघा रानडे
राजाभाऊ पाटकर
संतोष तिवारी
चारूलता शुक्ल
मंगल आजगांवकर
नलिनी सुधाकर खांडेकर
माधवी प्रकाश रामाणे
डॉ. ऋषिकेश नागवेकर
स्वप्नाली बाऊसकर
प्रशांत वैद्य

गौरी बांदोडकर
पंकज सदानंद दरेकर
दिपाली जोशी
स्वप्नील किरकिरे
दिपक पाटणकर
राजेंद्र पटवर्धन (कल्याण)
दिपा कुलकर्णी
डॉ. राजेंद्र मोरे
श्री. व सौ. कोठारे
मंगेश जाधव
संजय आपटे

शामसिंग यादव
दिपाली ग्रीन
विकास जयराम प्रधान
प्रज्ञा पुराणिक
विजय म्हामूणकर
क्रांती जाधव
आदिती शेटे
निमिश क्षितिजा अभय कोठारे
अनुराधा पेंडसे
अद्वैत पुरणिक

**निलेश सामंत - लॅपटॉप**

**भारती मुश्रीफ - व्हीलचेअर**

**दिलीप यादव क्रिएटीव्ह एंटरप्रायझेस - चहा प्रायोजक**

## भावपूर्ण श्रद्धांजली

राजेंद्र पटवर्धन
सुलभा देशपांडे
मुकुंद धर्माधिकारी
जगन्नाथ केणी
शारदा शरद मालवणकर

स्नेहल शिरबावीकर
कुमूदिनी वडदकर
जयंत गोखले
उषा परशूराम पाटणकर
प्रभाकर कुलकर्णी सर

शिला ब्रम्हानंद रिसबूड
शुभदा श्रीपाद पटवारी
सुलोचना नवरे (सिंधू वहिनी)
उमेश पै (सीए)
सुर्यकांत वाणी

**ह्या सर्व कुटुंबियांच्या दु:खात संस्था सहभागी आहे.सर्व मृतात्म्यास सद्गती लाभो हीच प्रार्थना**

# श्रावण महिना
# ''श्रावण मासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे''

श्रावण महिन्यात असे वातावरण सगळीकडे असते. आमच्या अपंगालयात श्रावण महिना भक्तीमय रूपात साजरा झाला. शब्द अपूरे आहेत. सोपले काका म्हणाले, '' या महिन्यात आपण सगळयांनी ''ॐ नमः शिवाय'' हा जप ज्योर्तिलिंगाच्या नावाने रोज 12 माळा करूयात.'' मग हा क्रम 10.30 ते 11.30 या वेळेत रोज सुरू झाला. टेबलावर स्वच्छ ताम्हनात पाणी ठेवले. बाजूला बेलपत्र, अगरबत्ती दिवा अशी सर्व तयारी झाली. सोपले काका तुम्ही छान तयारी केली आहे. ''ॐ नमः शिवाय'' जप सुरू झाला. प्रत्येक आजी आजोबांनी बेलपत्र पाण्यात वाहून मनाने भीमाशंकर, त्रंबकेश्वर, ओंकारेश्वर येथे जाऊन आले.

आता सोपले काकांनी शिवलिंगाची पिंड आणली. त्यावर क्रमानुसार जप केला.

''ॐ नमः शिवाय'' बिल्वपत्र समरपयामी
शमीपत्र समरपयामी
ब्रह्मकमळ समरपयामी
अक्षता समरपयामी.

समाप्तीला दिर्घ ''ॐ नमः शिवाय'' जपाने समाप्ती झाली या जपासाठी कोणी प्रसाद देतय, कोणी पंचखाद्य, कोणी फुले, फळे देत होतं. खुप छान झाला जपाचा कार्यक्रम.

या कार्यक्रमात कमिटीचे सदस्य, इतर येणारे पाहुणे, अपंगालयातील सदस्य सहभागी होते.

अशा तऱ्हेने श्रावण गोडाधोडाचा नैवेद्य, जपाने भक्तीमय वातारणात रंगला व संपन्न झाला.



## आयुष्य खुप सुंदर आहे

आयुष्य खुप सुंदर आहे
सुरुवात शेवटातलं अंतर आहे
पाहिला गेलो तर,
सारेच जंतर-मंतर आहे
कधी सावलीतली शांतता
कधी उन्हाची झळ आहे
कधी तृप्त मानसिकता
कधी वेदनेची कळ आहे
कधी फुलांचा वास आहे
कधी काट्यांचा त्रास आहे
कधी सारेच नकोसे आहे
कधी कुणीतरी खास आहे
कधी भरलेली ओंजळ आहे
कधी सारेच गहाण आहे
कधी उमलणारे फुल तर
कधी गळणारे पान आहे
कधी अंगणातला प्राजक्त आहे
कधी सारे वैराण आहे
कधी सुख मनसोक्त आहे
कधी दुःखाचे अंगार आहे
कधी गणिती अंक आहे
कधी भूमिती रेष आहे
कधी रसिक शृंगार आहे
कधी फक्त गणवेश आहे
दुरून हिरवे डोंगर आहेत
जवळून अनेक कंगोरे आहेत
मनाच्या कुंचल्याने
रंगवू तसे मनोरे आहेत
तरी आयुष्य सुंदर आहे
सुरूवात शेवटातलं अंतर आहे
कधी प्रवास खडतर आहे
कधी सुवासिक अत्तर आहे

- सौ. सुजाता साठे

# भरारी अस्थिव्यंग विकलांग संस्था, डोंबिवली

## BHARARI ASTHIVYANGA VIKALANGA SANSTHA, DOMBIVLI

NGO by the Physically Challenged for the Disabled Regd. No. F/5625/Thane Dt. 5/5/1997
Donations exempted u/s 80G Certificate No. AAATB3730GF20210 Dt. 10/03/2022 from AY 2022-23 to AY 2026-27
Income Tax Permanent A/c No. (PAN) : AAATB 3730G

## कार्यकारी मंडळ
## OFFICE BEARERS

| | | | |
|---|---|---|---|
| अध्यक्ष : अमिता कोकाटे | 7738384538 | President : Amita Kokatay |
| सचिव : हेमंत देशपांडे | 9820678968 | Secretary : Hemant Deshpande |
| खजिनदार : संध्या प्रधान | 9987067944 | Treasurer : Sandhya Pradhan |
| सदस्य : नितीन तेरसे | 9820066947 | Members : Nitin Terse |
| सीमा देशपांडे | 9167949320 | Seema Deshpande |
| सीमा जोग | 9221143759 | Seema Jog |
| शुभांगी काटदरे | 9819398000 | Shubhangi Katdare |
| जनसंपर्क अधिकारी : विनायक थत्ते | 9819633383 | P.R.O. : Vinayak Thatte |
| कार्याध्यक्ष : डॉ. अंजली आपटे | 9892072788 | Working President : Dr. Anjali Apte |
| सल्लागार : डॉ. अरूण पाटील | | Advisors : Dr. Arun Patil |
| श्री. अजित प्रधान | | Ajit Pradhan |
| श्री. अभय भावे | | Abhay Bhave |

## अपंगालय कार्यकारी समिती

अध्यक्ष : अमिता कोकाटे

| | | |
|---|---|---|
| श्री. नितीन तेरसे | डॉ. अंजली आपटे | श्री. हेमंत देशपांडे |
| श्री. विनायक थत्ते | सौ. संध्या प्रधान | सीमा देशपांडे |
| श्री. सतिश मिसाळ | सीमा जोग | सौ. सुषमा मांद्रेकर |
| श्री. विक्रम वैद्य | सौ. शुभांगी काटदरे | सौ. सविता आपटे |


## सेवक वर्ग

जयश्री बांदेकर (व्यवस्थापक) • विनायक लेले • लीलाबाई • चंद्रकला • सुशिला • कांता • रेणुका
शांताबाई • पूजा • सुवर्णा

## वैद्यकीय सहाय्य समिती

डॉ. अंजली आपटे • डॉ. अरूण पाटील • डॉ. भरत जैन • डॉ. तारा नाईक • डॉ. अद्वैत पाध्ये • डॉ. श्रीरंग अभ्यंकर
डॉ. हेमांगिनी देशपांडे • डॉ. राहूल करंदीकर • डॉ. कुमार चौहान • डॉ. निषाद ठाकूरदेसाई • डॉ. प्रज्ञा देसाई
डॉ. भक्ती लोटे • डॉ. रीना चौधरी • डॉ. अमरीश नंदा

**डॉ. रेखा प्रमोद लेले : पुरस्कृत**



तिशीत आली
प्रगल्भ झाली
ध्येयाकडे वाट
चालते भरारी

पाहता वळून मागे
पट उलगडे सारा
सहली आनंद रुपी
आठवणींचा पसारा

आठव पंचरत्नांचा
मधेच जी ओघळली
विचार त्यांचे रुजले
अन् दिशा ही मिळाली

हक्काचा दाखला मिळता
आत्मविश्वासही वाढे
प्रवास करताना हो
महत्त्व तयाचे कळे

प्रवासात ह्या सगळ्या
काळाची गरज कळे
अपंगालयाच्या निमित्ताने
पाऊल पुढती पडे

मार्ग आहे खडतर
चालायचे अविरत
या मिळून पुढे जाऊ
गुंफून हातात हात

जिद्द आणि कष्ट ह्यांचे
सहकार्य मिळावे तुमचे
काम नसे एकट्याचे
पुण्य मिळे माणुसकीचे

- मनिषा

**मुखपृष्ठ पुरस्कृत**
**राजु वडनेरकर**

**मलपृष्ठ पुरस्कृत**
**कै. आई बाबांच्या स्मरणार्थ**

मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ रेखाटन : प्रविण